जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
पुढारी

# पर्यावरणपूरक जीवन पद्धती अपरिहार्य : कुलगुरू शिर्के

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जागतिक हवामान बदलामुळे मानवासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी मानवाने पर्यावरणपूरक जीवन पद्धती अवलंबणे अपरिहार्य आहे, असे मत कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'हवामान बदल आणि प्रसारमाध्यमे' या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. इंडियन एक्स्प्रेसचे सहायक संपादक पार्थसारथी बिस्वास उपस्थित होते.

प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पत्रकार मोहसीन मुल्ला यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रेषित शहा व पार्षद शहा यांनी तयार केलेल्या 'प्लास्टिक ब्लॉक' या शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी निसर्गमित्र संस्थेचे अध्यक्ष अनिल चौगले, ए. आय. बागवान, जयप्रकाश पाटील, सहयोगी शिक्षक अभिजित गुर्जर, जयसिंग चव्हाण आदी उपस्थित होते. राधिका शर्मा हिने सूत्रसंचालन केले. सूरज कांबळे याने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
तरुण भारत

# स्कूल कनेक्ट अभियान यशस्वी करा : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातात होणारे स्कूल कनेक्ट संपर्क अभियान यशस्वी करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. स्कूल कनेक्ट (एनईपी कनेक्ट) संपर्क अभियान सर्व अकृषी विद्यापीठ स्तरावर सोमवार दि.१५ ते ३१ जानेवारी दरम्यान राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने संलग्नित महाविद्यालयांच्या समन्वयकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी सादरीकरण केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सूचना केल्या. उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी सुत्रसंचालन केले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयांचे आयक्यूएसी, एबीसी आणि एनईपी समन्वयक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
31 JAN 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वर्तन, वाचा एकसारखी ठेवा

## एस.के.एच. स्वामी : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा गांधी शरीररूपाने हयात नसले, तरी त्यांचे सिद्धांत, शिकवण अमरच राहील. अभ्यासायला एक आयुष्य पुरणार नाही, इतके समग्र लेखन त्यांनी केले आहे. देशातील प्रत्येकाने घरातील व समाजातील वर्तन व वाचा एकसारखी ठेवली, तर देशाचे कल्याण होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत एस.के.एच. स्वामी यांनी मंगळवारी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र, नेहरू अभ्यास केंद्र, समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने स्वामी यांचे 'नई तालीम : भारतीय शिक्षणाचा प्रयोग' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ गांधीवादी एस.के.एच. स्वामी यांनी चरख्यावर सूतकताईच्या प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

स्वामी म्हणाले, प्रत्येक घरात खादी वापरली गेली पाहिजे. त्यातून पाश्चात्य कपड्यांवर होणारा अनाठायी खर्च वाचून बचत होईल. रुपयाची कदर करून जितकी बचत कराल, तितके आयुष्य समाधानी बनेल. कारण बचत हेच संवर्धन आहे. देशातल्या आणि जगातल्या गोरगरिबांच्या गरजांचा विचार करून उच्चशिक्षण क्षेत्राने त्या गरजांच्या पूर्तीसाठी संशोधनकार्य करणे गांधींना अपेक्षित होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधी यांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विचारांचा जितका अभ्यास झाला, तितका उच्चशिक्षणाच्या अनुषंगाने झाला नाही. उच्चशिक्षणाच्या बाबतीत भारताने पाश्चात्यांचे अंधानुकरण थांबवावे. भारतीय व्यवस्था व येथील मूल्यांवर आधारित शिक्षण असावे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी आभार मानले.

31 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधींच्या शिक्षणविषयक विचारांचा जागर

## विद्यापीठात प्रात्यक्षिकांतून 'नई तालीम'वर गांधीवादी विचारवंत स्वामींचे मार्गदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा जागर घालत आजची सकाळ ही ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत एस. के. एच. स्वामी यांनी 'नई तालीम' मय करून सोडली. त्यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांचा वेध घेताना वक्तव्याला प्रात्यक्षिकांची जोड दिली. यामुळे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी भारावून गेले.

विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, नेहरू अभ्यास केंद्र, समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनातर्फे महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गांधीवादी विचारवंत स्वामी यांचे 'नई तालीम: भारतीय शिक्षणाचा प्रयोग' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर प्रमुख उपस्थित होते. स्वामी यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्यात चरख्यावर सूतकताई कशी करतात, घरातल्या प्रत्येक टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार कशी करावी, आदींचा समावेश होता. एकीकडे पैशाची बचत करणे आणि दुसरीकडे बचत हेच संवर्धन हा मूलमंत्र देणे, अशा दुहेरी पातळीवर त्यांनी संवाद साधला. स्वामी म्हणाले, 'महात्मा गांधी शरीररुपाने हयात नसले, तरी त्यांचे सिद्धांत, शिकवण ही अमरच राहील. प्रत्येक मनुष्याने घरातील व समाजातील वर्तन व वाचा एकसारखी ठेवली, तर देशाचे कल्याण होईल.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिक्षणाचा समग्र विचार न करता आपण केवळ अभ्यासक्रम म्हणून त्याकडे पाहतो, ही फार मोठी गफलत आहे. व्यवहारकुशलता हा शिक्षणाचा मूळ गाभा बनायला हवा.' डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ गांधीवादी एस.के.एच. स्वामी यांनी चरख्यावर सूतकताईच्या प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते.

### शिक्षण व शेतीत एकात्मता असावी

■ डॉ. चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधी यांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विचारांचा जितका अभ्यास झाला, तितका उच्चशिक्षणाच्या अनुषंगाने झाला नाही. गांधींच्या मागणीमुळेच देशात गुजरात, काशी आणि टिळक विद्यापीठे स्थापन झाली. भारतीय व्यवस्था व येथील मूल्यांवर आधारित शिक्षण असावे. सर्व विषयांचे शिक्षण विद्यापीठामध्ये असावे. शिक्षण व शेती यांच्यात एकात्मता असावी. भारतीयांसाठी उपयुक्त अशा संशोधनाला चालना देण्यात यावी. शिक्षकांना योग्य वेतन द्यावे, पण गलेलठ्ठ पगार देऊ नयेत, त्यामुळे विद्यापीठांची स्वायत्तता धोक्यात येण्याची शक्यता असते, अशी भूमिका गांधीजींनी मांडलेली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
पुढारी

# महात्मा गांधींच्या 'नई तालीम'चे विद्यापीठात प्रात्यक्षिकांसह दर्शन

## ज्येष्ठ गांधीवादी एस. के. एच. स्वामी यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा जागर करताना ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत एस. के. एच. स्वामी यांनी महात्मा गांधी यांच्या 'नई तालीम'विषयक विचारांचा वेध घेताना वक्तव्याला दिलेली प्रात्यक्षिकांची जोड उपस्थितांना भारावून टाकणारी ठरली.

शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, नेहरू अभ्यास केंद्र, समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गांधीवादी विचारवंत एस. के. एच. स्वामी यांचे 'नई तालीम : भारतीय शिक्षणाचा प्रयोग' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी म्हणाले, महात्मा गांधी शरीररूपाने हयात नसले, तरी त्यांचे सिद्धांत, शिकवण अमर राहील. डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधी यांच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विचारांचा जितका अभ्यास झाला, तितका उच्चशिक्षणाच्या अनुषंगाने झाला नाही. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गांधींनी आपल्याला पर्यावरणकेंद्री जीवनमूल्ये शिकविली. प्रत्यक्षात आपली वाटचाल त्याउलट सुरू आहे. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 JAN 2024 पुण्यनगरी

# 'शिवाजी विद्यापीठ-आयसीएआय' यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचा नवी दिल्ली येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडिया संस्थेसमवेत नुकताच सामंजस्य करार झाला. या कराराचा विद्यापीठाचे विद्यार्थी तसेच शिक्षकांनाही मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

नवी दिल्ली येथे नुकतीच नॅशनल एज्युकेशन समिट ऑफ कॉमर्स अँड अकौंटन्सी २०२४ (नेस्का-२०२४) या दोनदिवसीय उपक्रमाच्या पहिल्या दिवशी सामंजस्य करार समारंभ पार पडला. विद्यापीठातर्फे वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यावेळी उपस्थित होते. सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडियाचे सेक्रेटरी डॉ. जयकुमार बत्रा यांनी स्वाक्षरी केल्या. करार होण्यासाठी उपसंचालक डॉ. एन. एन. सेनगुप्ता आणि अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी समन्वयाचे काम केले.



कोल्हापूर : इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडियासमवेत सामंजस्य कराराप्रसंगी डॉ. ज्योती बत्रा, सीए रणजितकुमार अग्रवाल, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, सीए दयानिवास शर्मा.

दोन्हीही संस्थांनी शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण यामध्ये केलेल्या कार्यातून ज्ञान आणि कौशल्य यासंदर्भात उत्कृष्टता निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी सामंजस्य कराराच्या माध्यमातून एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने इन्स्टिट्यूट विशेष सत्राचे आयोजन करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सहकार्य करणार आहे.

संशोधन प्रकल्प, शिक्षक विकास कार्यक्रम तसेच क्षमता विकास कार्यक्रम आणि कार्यशाळा, परिषद व चर्चासत्र असे शैक्षणिक कार्यक्रमही संयुक्तपणे आयोजित करण्यात येतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
पुढारी

# प्रियांका माळकर नेट परीक्षा उत्तीर्ण

कोल्हापूर : विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे घेतलेल्या नेट परीक्षेत प्रियांका माळकर या रशियन भाषा विषयात उत्तीर्ण झाल्या. परीक्षेत ३०० पैकी १७२ गुण मिळवून त्या गुणवत्ता यादीत प्रथम आल्या आहेत. प्रियांका यांनी विदेशी भाषा विभागात रशियन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमापासून सुरुवात करून एम.ए. पदवी प्राप्त केली. विदेशी भाषा विभागातर्फे सत्कार समारंभात विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी भविष्यात प्रियांका रशियन भाषेच्या शिक्षिका व संशोधक म्हणून नावलौकिक मिळवतील, असा विश्वास व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला १,११३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला १,११३ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅलचर ऑफ़ लॉ (फाईव्ह ईयर) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
सकाळ

# 'चौकटीबाहेर जाऊन विचार करा'

कोल्हापूर : 'चांगले भविष्य शोधणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी चौकटीबाहेर जाऊन विचार करावा', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. एम. साळुंखे यांनी केले. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात 'अशक्यतेच्या स्वयंसिद्धतेला आव्हान द्या' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
सकाळ

# प्राणिशास्त्र विभागातील पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याला पीएच.डी.



फैसल फलिह

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील इराकचे संशोधक विद्यार्थी फैसल फलिह फैसल याला आज विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली. ते प्राणिशास्त्र विभागातून पीएच.डी. प्राप्त करणारे पहिले आंतरराष्ट्रीय विद्यार्थी ठरले आहेत.

फैसल याने 'इफेक्ट ऑफ पिरिमिकार्ब ऑन फिंगरलिंग्ज ऑफ फ्रेशवॉटर फिश सिरिन्हिस मृगला' या विषयावर विद्यापीठास शोधनिबंध सादर केला. त्याला प्राणिशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. माधव भिलावे यांचे मार्गदर्शन लाभले. या शोधनिबंधावरील मौखिक परीक्षा आज झाली. यासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. योगेश भुते उपस्थित होते. परीक्षेचे अध्यक्षपद प्रा. डॉ. शिवानंद यन्कंची यांनी भूषविले. यावेळी आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मंडळाचे समन्वयक प्रा. अनिल घुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महिला रग्बी संघाची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघासमवेत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अमर सासने, शरद बनसोडे उपस्थित होते.

# विद्यापीठ महिला रग्बी संघाची 'खेलो इंडिया'साठी निवड

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : चंदीगड विद्यापीठ मोहाली (पंजाब) येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धा झाली. त्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या संघाने सेव्हन साईड प्रकारामध्ये सुवर्णपदक, तर फिफ्टीन साईड प्रकारामध्ये रौप्यपदक पटकावले. या संघाची खेलो इंडियासाठी निवड करण्यात आली. त्या संघात शुभांगी गावडे, कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, पूजा कुंभार, शीतल शिनगारे, पूनम पाटील, साक्षी कुंभार, स्वाती माळी, नेहा पाटील, प्राची पारखे, सानिका पाटील, साक्षी चौगुले, वसुधा माळी, पल्लवी डवर, वैष्णवी सरनोबत, कार्तिकी पाटील यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, कोल्हापूर जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. अमर सासने, प्रशिक्षक दीपक पाटील, प्रा. राहुल लहाने, संघ व्यवस्थापक प्रा. संग्रामसिंह मोरे, सूचय खोपडे उपस्थित होते.

31 JAN 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ महिला संघाची खेलो इंडिया गेम्ससाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सेवन साईड महिला रग्बी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने जोरदार कामगिरी करत यजमान चंदीगड विद्यापीठ संघाला (सीयू मोहाली) १२–५ ट्रायफरकाने पराभूत करत सुवर्णपदक जिंकले. या सुवर्ण कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठ संघाची गुवाहाटी (आसाम) येथे होणाऱ्या खेलो इंडिया गेम्समधील महिला रग्बी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फिफ्टीन साईड महिला रग्बी स्पर्धेच्या मात्र शिवाजी विद्यापीठ संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठ संघाने शिवाजी विद्यापीठ संघाला ५–० ट्रायने मात दिली.

मोहाली (पंजाब) येथील चंदीगड विद्यापीठातील मैदानात सेवन व फिफ्टीन साईड प्रकारातील स्पर्धा झाल्या. सेवन साईड स्पर्धेमध्ये देशभरातून ४८ विद्यापीठाच्या तर फिफ्टीन साईड स्पर्धेत देशातील १८ विद्यापीठाच्या महिला संघांनी प्रतिनिधित्व केले. यापैकी सेवन साईड स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने कालिकत विद्यापीठाला, दुसऱ्या सामन्यात किट युनिर्व्हसिटीला (भुवनेश्वर, ओडीशा) तर उपांत्यपूर्व सामन्यात युनिर्व्हसिटी ऑफ केरळा संघाला पराभूत करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य सामन्यातही शिवाजी विद्यापीठ संघाने जिंद विद्यापीठाला १५–० ट्रायने जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही विजेत्या संघांसोबत (डावीकडून) प्रा. अमर सासने, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटिल, कुलगुरू डॉ. दीगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी.

फिफ्टीन साईट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने दोन सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत पंजाबच्या लवली प्रोफेशन विद्यापीठावर १५–५ अशा ट्रायफरकाने विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. विद्यापीठाच्या दोन्ही संघांना कुलगुरू डॉ. दीगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, कोल्हापूर जिल्हा रग्बी असो. अध्यक्ष प्रा. अमर सासने, प्रशिक्षक दीपक पाटील, प्रा. राहुल लहाने व संघ व्यवस्थापक प्रा. संग्रामसिंह मोरे, सूचय खोपडे यांचे मार्गदर्शन लाभले.

संघातील खेळाडू : शुभांगी गावडे, कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, पूजा कुंभार, शितल शिनगारे, पूनम पाटील, साक्षी कुंभार, स्वाती माळी, नेहा पाटील, प्राची पारखे, सानिका पाटील, साक्षी चौगुले, वसुधा माळी, पल्लवी डवर, वैष्णवी सरनोबत, कार्तिकी पाटील, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, समृद्धी माळी, दुर्गा सरगडे, दिव्या पोवार, तनुजा निकम.